महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# पोलीस उप आयुक्त वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

OW/DCP TRAFFIC THN/ADM/NOTIFICATION / 15 /2022 DATE 14 /02/2022

## "वाहतुक नियंत्रण अधिसुचना"

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका अंतर्गत वागळे इस्टेट वाहतूक उपविभागाचे कार्यक्षेत्रातील शास्त्रीनगर नाका ते देवदयानगर कडे जाणाऱ्या रस्त्यावरील मंत्रांजली बंगला येथील रोडवर कल्व्हर्टचे ५० फुट रूंद ३५० मिटर लांबीचे पुर्नबांधणीचे काम ठाणे महानगरपालिका कडून करण्यात येणार आहे. त्याकरीता सर्व प्रकारच्या वाहनांची वाहतूक पर्यायी मार्गाने वळविणे आवश्यक असल्याने व ठाणे शहर परिसरात वाहतूक कोंडी होवू नये वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होणे करीता आम जनतेच्या सोईसाठी,

**त्याअर्थी,** मी बाळासाहेब पाटील, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे:–

**प्रवेश बंद –** शास्त्रीनगर चौक कडून देवदयानगर कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना देवदयानगर नाका येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने शास्त्रीनगर चौक – येवूर मेन गेट समोरून उपवन तलाव – राघोजी भांगरे चौक – बिरसा मुंडा चौक – देवयानगर मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** निळकंठ सोसायटी, बेथनी हॉस्पीटल येथून शास्त्रीनगर कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना बिरसा मुंडा चौक येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने बिरसा मुंडा चौक येथून उपवन कडून राघोजी भांगरे चौक – उपवन तलाव – शास्त्रीनगर मार्गे इच्छित स्थळी जातील.
सदरची वाहने बिरसा मुंडा चौक येथून बेथनी हॉस्पिटल मार्गे गांधीनगर चौक – रवि स्टील नाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची अधिसुचना ही दि. १५/०२/२०२२ पासून कल्व्हर्ट पुर्नबांधणीचे काम पूर्ण होईपर्यंत १ महिन्याकरीता अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडॉर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागु राहणार नाही.

**( बाळासाहेब पाटील )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,
जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

**प्रत कार्यवाहीकरीता :-**

प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, बृहन्मंबई व वसई-विरार महानगरपालिका.
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-५ वागळे इस्टेट व विशेष शाखा,ठाणे

**प्रत** :- पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे,ठाणे शहर
२/- सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :- समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे
२/- सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :- सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व पो.निरी. ठाणेनगर, नौपाडा, कोपरी वाहतूक उप विभाग.
२/- म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावी